वि.दि.दावा.क्र. २९/२०२३
दुर्गाबाई वि. नारद वगैरे
निशाणी क्र.१०६

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २- मंगेश प्रल्हाद बरबटे,
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. केला यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. साक्षीदाराला नि.क्र. १०४ कबुलीपत्र दाखविण्यात आले. दुर्गाबाई आणि नारद यांच्यामध्ये पैशाचा व्यवहार झाला होता. सदर व्यवहार हा दुर्गाबाईचा चेक गहाळ झाला असल्यामुळे झाला होता. सदर धनादेश हा नारद यांनी दिला होता. सदर गहाळ झालेल्या धनादेशाची रक्कम म्हणजेच रु.१२ लाख माझ्या समक्ष नारद यांनी दुर्गाबाईला दिले. त्याबाबतचे कबुली पत्र बनविण्यात आले होते. साक्षीदाराला कबुली पत्र दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर कबुलीपत्र तेच आहे. साक्षीदाराने सांगितले की, त्यावर दुर्गाबाई, नारद, रमेश आणि साक्षीदार म्हणुन मी आणि पुष्पा पिपरहेटे आणि एकराम यांच्या सहया आहेत. कबुलीपत्रातील मजकुर हा खरा व बरोबर आहे. सदर कबुली पत्र निशानी १०४ वर आहे. सदर कबुलीपत्रावर दुर्गाबाईने समजुन सही केली होती.
सरतपास पुर्ण.

उलटतपास वादी तर्फे त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. आर.पी.अंबरवेले यांद्वारे -

३. यापुर्वी मी कोणत्याही प्रकरणामध्ये साक्ष दिली नाही. मला न्यायालयामार्फत साक्ष समन्स आले नव्हते. मला साक्षीसाठी नारद दारोडे यांनी बोलावले. मी नारद दारोडे यांनी मागिल २० वर्षापासुन ओळखत आहे. त्यांच्यासोबत माझे चांगले संबंध आहेत. वादी प्रतिवादी कोणकोण आहेत याची मला माहिती नाही. वादींनी कशाकरीता दावा दाखल केला याची मला माहिती नाही. खरेदीविक्रीच्या व्यवहाराबददल मला माहिती नाही. या व्यवहारामध्ये किती पैसे देण्यात आले आणि किती देण्यात आले नाही याची मला माहिती नाही. हे नारद दारोडे यांनी मला सांगितले नाही की २००९ मध्ये त्यांनी धनादेश दिला होता. मी माझे स्वतःचे चेकचे व्यवहार केलेले आहेत. मला त्याबाबत माहिती आहे. सन २००९ मध्ये दिलेल्या धनादेशाचा उपयोग सन २०१२ मध्ये करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की सन २००९ मध्ये धनादेश दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की चेक न दिल्यामुळे गहाळ होण्याचा प्रश्न येत नाही. कबुली पत्र मी वाचले होते.

कबुलीपत्रामध्ये नमुद असलेल्या सर्वे नंबर बाबत मी पडताडणी केली नाही. विक्रीपत्र कधी झाले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की कबुली पत्रामधील सर्व मजकुर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की दुर्गाबाईला कोणतीही रक्क्म दिनांक २५/१०/२०१० रोजी कोणतीही रक्कम देण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की नारद दारोडे यांनी पुर्वीच कबुली पत्र बनवुन ठेवले होते. कबुली पत्र माझ्यासमक्ष बनविण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की चेक हा २०१२ मध्ये देण्यात आला होता त्यामुळे २०१० मध्ये कबुली पत्र बनविण्याचा प्रश्न येत नाही. हे म्हणणे खरे नाही की नारद दारोडेच्या सांगण्यावरुन खोटे कबुली पत्र बनविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की दुर्गाबाई आणि रमेशने कधी कबुली पत्रावर सहया केल्या नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की माझ्या समक्ष सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की दुर्गाबाई आणि रमेश कधी आलेच नव्हते. हे म्हणणे खरे नाही की खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.04.07 12:34:43 +0530

दिनांक ०७.०४.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)